**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**RESERVE BANK OF INDIA**
**RBI On Internet:**
http://www.rbi.org.in
**Email: helpprd@rbi.org.in**

एप्रिल १९, २००४

**रिझर्व्ह बँकेने बँकांना वजनावर नाणी स्वीकारण्यास सांगितले**

नागरिक आता सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील बँकाच्या काऊंटर्सवर, तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या काऊंटर्सवरही चालू असलेली व चालू नसलेली नाणी देऊ शकतील. ही नाणी रिझर्व्ह बँक व इतर बँका वजनाच्या आधारे स्वीकारतील.

भारतीय रिझर्व्ह बँकेने मुंबईमधील सर्व सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील बँकांच्या शाखांना ५ पैशांची, १० पैशांची स्टेनलेस स्टीलची नाणी, २५ पैशांची, ५० पैशांची व एक रुपयाची कॉपर निकलेची नाणी वजनाच्या आधारे स्वीकारण्यास सांगितले आहे. रिझर्व्ह बँकेने ज्या नागरिकांकडे अशा नाण्यांचे साठे असतील अशांना, ही नाणी किमतीनुसार व धातूनुसार प्रत्येकी १०० नाणी पॉलिथिनच्या पिशव्यांमध्ये काऊंटर्सवर देण्याची विनंती केली आहे. अशाच प्रकारची व्यवस्था सध्या चलनात असलेल्या २५ पैशांच्या, ५० पैशांच्या व एक रुपयाच्या स्टेनलेस स्टीलच्या नाण्यांसाठी तसेच दोन रुपयांच्या व पाच रुपयांच्या कॉपर निकेलच्या नाण्यांसाठी ही अस्तित्वात आहे.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/१२४१**